सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : १४४२(२)(२)/२०१९/१३-अ दिनांक : २७ जुलै, २०२१.

**-: घोषणा :-**

विषय : पोलीस उपनिरीक्षक महाराष्ट्र दुय्यम सेवा, अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा – २०१९, पदसंख्या व आरक्षणातील बदलाबाबत.

संदर्भ : १. जाहिरात क्रमांक ०१/२०१९, दिनांक ९ जानेवारी, २०१९.
२. अधिसूचना क्रमांक : एनओटी-३६१८/सीआर-३१/२०१८/तीन, दिनांक २१ जून, २०१९.
३. घोषणा क्रमांक : एएसपी-०३१९/सीआर-५३अ/२०१८/तीन, दिनांक ७ नोव्हेंबर, २०१९.

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या अधिपत्याखालील पोलीस उप निरीक्षक संवर्गातील भरतीकरीता दिनांक ९ जानेवारी, २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरून महाराष्ट्र दुय्यम सेवा, अराजपत्रित, गट-ब (पूर्व) परीक्षा - २०१९ ही परीक्षा रविवार, दिनांक २४ मार्च, २०१९ रोजी घेण्यात आली. तसेच संदर्भांकित अधिसूचनेस अनुलक्षून विषयांकित पदाकरीता मुख्य परीक्षा दिनांक २८ जुलै, २०१९ व दिनांक ४ ऑगस्ट, २०१९ रोजी घेण्यात आली. प्रस्तुत मुख्य परीक्षेचा निकाल दिनांक २ मार्च, २०२० रोजी जाहिर करण्यात आला.

**२.** सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल सिव्हिल अपील क्रमांक ३१२३/२०२० या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ५ मे, २०२१ रोजीच्या न्यायनिर्णयानुसार सदर प्रवर्गाचे आरक्षण रद्दबातल ठरविण्यात आल्यामुळे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०२०/प्र.क्र.३२०/१६ब, दिनांक ५ जुलै, २०२१ अन्वये भरतीप्रक्रिया राबविण्यासंदर्भात शासनाकडून सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाकरीता आरक्षित असलेली पदे अराखीव पदांमध्ये रुपांतरित करून संबंधित परीक्षेची निकाल प्रक्रिया राबविणे क्रमप्राप्त ठरते.

**३.** प्रस्तुत दिनांक ५ जुलै, २०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींच्या आधारे सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाकरिता आरक्षित पदे अराखीव पदांमध्ये रुपांतरित केल्यानंतर विषयांकित पोलीस उपनिरीक्षक, महाराष्ट्र दुय्यम सेवा, अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा - २०१९ मधून भरावयाच्या एकूण ४९६ पदांचा सुधारित तपशील खालीलप्रमाणे आहे.

| पोलीस उपनिरीक्षक, महाराष्ट्र दुय्यम सेवा, अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा - २०१९ (एकूण ४९६ पदे) | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्रवर्ग** | **अ.जा.** | **अ.ज.** | **वि.जा. (अ)** | **भ.ज. (ब)** | **भ.ज. (क)** | **भ.ज. (ड)** | **इ. मा. व.** | **वि. मा. प्र.** | **एकूण आरक्षित पदे** | **अराखीव पदे** | **एकूण पदे** |
| पदसंख्या | ६५+३* | ३५+३* | १५+२* | १२ | १७+१* | १० | ९४ | १० | २६७ | २२९ | ४९६ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ४५ | २५ | ११ | ७ | १२ | ६ | ६१ | ६ | १७३ | १४७ | ३२० |
| महिला | २० | ११ | ५ | ४ | ५ | ३ | २८ | ३ | ७९ | ६९ | १४८ |
| खेळाडू | ३ | २ | १ | १ | १ | १ | ५ | १ | १५ | ११ | २६ |
| अनाथ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | २ |
| *** अनुशेषाची पदे** | | | | | | | | | | | |

**४.** सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाच्या ज्या उमेदवारांनी अराखीव प्रवर्गासाठी विहित करण्यात आलेली वयोमर्यादा ओलांडली असेल त्यांनी वयोमर्यादेतील सवलतीकरीता तद्अनुषंगिक प्रमाणपत्र मुलाखतीच्यावेळी सादर करणे अनिवार्य राहील.

**५.** उपरोक्त सुधारीत पदसंख्या व तरतुदींआधारे विषयांकित पोलीस उपनिरीक्षक, महाराष्ट्र दुय्यम सेवा, अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा - २०१९ करीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

**६.** विषयांकित पदाच्या जाहिरात व अधिसूचनेतील अन्य अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही

ठिकाण : मुंबई.

उप सचिव (परीक्षा-१),
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.